**लाच प्रतिबंधक विशेष खटला क्र. २०/२०१४**
**सरकार वि. विनोद**
**नि.क्र. ३३ खाली**

**साक्षीदार क्र.१ यांचा पुढील उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.बी. तिवारी यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

०८. माझे शिक्षण इयत्ता दुसरी इतके झाले आहे. सन २०१४ साली मी शेत मजुरीचे काम करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, दादापुर, वाकपुर, एरंडगांव, मसला ही वेगवेगळी गावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दादापुर, वाकपुर व एरंडगाव हे नांदगाव खंडेश्वर या तहसील हद्दीत येतात. हे म्हणणे खरे आहे की, जो व्यक्ती ज्या ग्राम पंचायतच्या हद्दीत राहतो, त्याच गावात त्याला घरकुल मिळते. हे म्हणणे खरे आहे की, त्याकरीता पहिल्यांदा ग्रामपंचायत मध्ये अर्ज करावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यासोबत पंचायत समिती मध्ये देखील अर्ज करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, पंचायत समिती ग्रामपंचायत कडुन लाभार्थींची यादी बोलावितात. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पंचायत समिती समोर लाभार्थी यांना कागदपत्रांची पुर्तता करावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, घरकुल करीता वारसाचा दाखला लागत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घरातील एकाला व्यक्तीला घरकुलाचा लाभ मिळाल्यानंतर, घरातील दुस–या व्यक्तीला तो लाभ मिळत नाही.

०९. मला लेखी तक्रार व तोंडी तक्रार यामधील फरक समजतो. हे म्हणणे खरे आहे की, मी लेखी तक्रार घेवुन लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयात गेलो होतो. असे झाले नव्हते की, मी सांगितल्यावरून माझी तक्रार लिहुन घेण्यात आली होती. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी सांगितल्यावरून माझी तक्रार लिहुन घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी तक्रार टंकलिखीत केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी तक्रार

**लाच प्रतिबंधक विशेष खटला क्र. २०/२०१४**
**सरकार वि. विनोद**
**नि.क्र. ३३ खाली**

दिल्यानंतर मला लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयातुन सुचना मिळाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्या सुचनेमध्ये मला असे सांगितले होते की, जे व्हॉईस रेकॉर्डरवर मला दिले होते, त्याला हात लावु नये. हे म्हणणे खरे आहे की, तसेच माझ्यासोबत जे पंच होते त्यांच्यावर संशय येवु नये म्हणुन थोड्या अंतरावर उभे राहावे अशी सुचना मला देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला अशी सुचना देण्यात आली होती की, आरोपीने पैसे मागितल्याशिवाय त्याला पैसे देवु नये.

१०. फिर्याद देण्यापुर्वी मी व्हॉईस रेकॉर्डरचा उपयोग केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, व्हॉईस रेकॉर्डरबद्दल मला काहीही माहिती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, व्हॉईस रेकॉर्डर मला देतांना त्यामध्ये डाटा होता की नाही हे मला माहित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला अटक केल्यानंतर, जी.आर.पी. ऑफीस बडनेरा येथे नेले होते व मला तसेच पंचांना बाहेर थांबण्यास सांगितले होते. आरोपीला अटक केल्याचे स्थळ व जी.आर.पी. ऑफीस हे जवळच आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी पोलीसांनी माझ्याकडुन वारसाचा दाखला जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, लाचलुचपत प्रतिबंध अधिकारी यांनी जी.आर.पी. ऑफीस मध्ये बसुन पंचनामे तयार केले होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर माझ्या सह्या जी.आर.पी. ऑफीस मध्ये घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला जेव्हा अटक केली तेव्हा पोलीसांनी माझे हात तपासले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, किरण ब्राह्मणे समक्ष मला वारसाचा दाखला आधीच भेटला होता. हे म्हणणे खरे आहे की, छापा टाकल्यानंतर पंच क्रमांक १ ईश्वरे यांना आरोपीच्या खिश्यातुन पैसे काढण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर पैसे ईश्वरे यांना हातात धरून ठेवण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सांगितल्याप्रमाणे ईश्वरे यांनी

रक्कम त्यांच्या हातात धरून ठेवली होती. हे म्हणणे खरे नाही की, लाचलुचपत प्रतिबंध अधिकारी यांनी ईश्वरे यांच्या हातातुन नोटा जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी जबरदस्ती नोटा आरोपीच्या खिशात टाकल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरकायदेशीर कागदपत्रावरून आरोपीला वारस दाखला मागत होतो परंतु त्याने नकार दिल्यामुळे मी त्याला खोट्या केस मध्ये अडकवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगितले की, वारस प्रमाणत्र देण्याकरीता आरोपीने माझ्याकडुन १५००/– रूपये लाच मागितली होती व मी त्याला ५००/– रूपये देवनु, बाकीची रक्कम २–३ दिवसांत देतो असे म्हटले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगितले की, ८–१० दिवसानंतर आरोपीने मला उर्वरीत रक्कम घेवुन बडनेरा एस.टी. स्टॅन्ड येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथेवर खोटी साक्ष दिली आहे व मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी रागाच्या भरात आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामधील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/–

**(एस. एम. कनकदंडे)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
अमरावती
दि. २१/०२/२०२६

माझे समक्ष,

स्वा/–

**(एस. एम. कनकदंडे)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
अमरावती
दि. २१/०२/२०२६